# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 30/12/2020 (बुधवार)
(सायंकाळ)

---

### चोरीचा प्रयत्न करणाऱ्या महिला आरोपीतांना अटक

पो.स्टे. मौदा :– दिनांक 28/12/2020 चे 13:00 वा. दरम्यान बॅक ऑफ बडोदा चे समोर मौदा फिर्यादी नामे– रमेश नत्थजी टेके, वय 55 वर्ष, रा. कुंभापुर ता. मौदा जि. नागपूर हे आपले मित्रासह क्रॉप लोन भरण्याकरीता 1,00,000/–रू. घेवून गेले असता ते बॅकेचे एटीएम समोर टेबलवर बसुन पैसे भरण्याची स्लिप भरीत असतांना महिला आरोपी नामे क्र. 1) कल्पनाबाई जितेन्द्रसिंग सिसोदीया, वय 32 वर्ष व 2) रिना मांगीलाल सिसादिया, वय 25 वर्ष दोन्ही रा. कडीया ता. पाचोरे जि. रायगड(म.प्र) ह. मु. रेल्वे स्टेशन जवळ नागपूर यांनी आपसात संगनमत करून फिर्यादीचे पैश्याच्या थैलीला ब्लेडने चिरे मारून त्यातील 1,00,000/–रू. चोरण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम 379, 511, 34 भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. दोन्ही महिला आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा चांगदेव कुथे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागीय पोलिस अधिकारी कामठी विभाग श्री. मुखतार बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली पो. स्टे. मौदाचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. हेमंतकुमार खराबे, पो.हवा चांगदेव कुथे, ना.पो.शि शैलेश बेले, पोशि. कपोल तभाने, विश्वास चव्हाण, अतुल निंबार्ते यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर